तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६२०६०१, २२६२०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स २२६१२१०२.
E-mail : desk16.dte@gmail.com Website : www.dte.org.in


अतितात्काळ
ई-मेल द्वारे

क्रमांक : १६/आस्था/रा.प्र.धो./बैठक/२०१३/905
दिनांक :

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती व नागपूर.

सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागासाठी सन २०१३-२०१४ चा प्रशिक्षण आराखडा.

उपरोक्त विषयाबाबत शासन पत्र क्रमांक : राप्रधो-२०१३/प्र.क्र.१८-२०१३/आस्था-२, दिनांक ३१.०५.२०१३ ची प्रत सोबत जोडली आहे.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : टीआरएन ०९/प्र.क्र. ३९-०९/१२-अ, दिनांक २३.०९.२०११ अन्वये, राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यांत आले असून सन २०१३-२०१४ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागातील प्रशिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता सहसचिव (आस्थापना), उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०७.०६.२०१३ रोजी समिती सभागृह, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता बैठक आयोजित करण्यांत आलेली आहे. सदर बैठकीमध्ये प्रशिक्षणाचे नियोजन व पूर्वतयारी याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. तरी सदर बैठकीसाठी आपण व्यक्तिशः उपस्थित रहावे. मां. सहसचिव यांच्याबरोबर दुपारी २.०० वाजता होणाऱ्या बैठकीच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर पूर्वतयारीसाठी सकाळी ११.०० वाजता संचालनालयात उपस्थित रहावे.

दिनांक ०७.०६.२०१३ रोजी बैठकीच्या अनुषंगाने आपल्या विभागाची खाली नमूद मुद्यांबाबतची माहिती या संचालनालयास तात्काळ सादर करण्यांत यावी, तसेच त्याची एक प्रत बैठकीच्या वेळी आपणासोबत ठेवण्यांत यावी.

१. आपल्या विभागातील गट-अ ते गट-ड कर्मचाऱ्यांची विहित विवरणपत्रातील माहिती. (या संचालनालयास विहित विवरणपत्रात सादर करण्यांत आलेल्या माहितीमध्ये समाविष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्यांची जन्मतारीख व शासन सेवेत नियुक्तीची तारीख

दिवस महिना वर्ष या पध्दतीने बरोबर नमूद केलेली असल्याची खात्री करुन घेण्यांत यावी व त्यामध्ये चूक असल्यास सुधारीत करुन सादर करावी.)

२. आपल्या विभागातील गट-अ ते गट-ड कर्मचाऱ्यांची गटनिहाय संख्या.

३. अधिकारी / कर्मचारी यांचा शासन सेवेतील एकूण कालावधी.

४. सध्याच्या पदावर सरळसेवेने वा पदोन्नीने कार्यरत असलेला सेवा कालावधी.

५. विशेष प्रशिक्षण आवश्यक वाटत असल्यासे त्याबाबतची माहिती.

( दयानंद मेश्राम )
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : कार्यासन क्रमांक-४, ४अ व १२ मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

पृ.क्र.विकाअ/आस्था/प्रशिक्षण/२०१३/१५२६
दिनांक ५/६/२०१३

प्रतिलीपी: प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती,/शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगांव/वाशिम/मुर्तीजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ

त्यांना कळविण्यात येते की, वरिल पत्रातील मुददा क्र. १ ते ५ ची अदयावत माहिती मंत्रालयास सादर करावयाची असल्यामुळे माहिती तात्काळ ईमेलव्दारे न चुकता या कार्यालयास सादर करावी.
(सोबतच्या प्रपत्रानुसार)

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

# Profarma for data collection

*Name of Department :-

*Name of Organisation:-

( * Madatory field)

| Sr. no. | *Name of Employee | *Designation | *Employment Group (A/B/C/D) | *Date of Birth | *Date of Joining | *Level of office (State/Division/District/Block/Local) | *Name of the office | *Address of the office | अधिकारी/कर्मचारी यांचा शासन सेवेतील एकूण अनुभव | सध्याचे पदावरील (पदोन्नती/सरळसेवेने) कार्यरत अनुभव | विशेष प्रशिक्षण आवश्यक वाटत असल्यास त्याबाबत माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | | | |
| 13 | | | | | | | | | | | |
| 14 | | | | | | | | | | | |
| 15 | | | | | | | | | | | |
| 16 | | | | | | | | | | | |
| 17 | | | | | | | | | | | |
| 18 | | | | | | | | | | | |
| 19 | | | | | | | | | | | |
| 20 | | | | | | | | | | | |
| 21 | | | | | | | | | | | |
| 22 | | | | | | | | | | | |
| 23 | | | | | | | | | | | |
| 24 | | | | | | | | | | | |
| 25 | | | | | | | | | | | |
| 26 | | | | | | | | | | | |
| 27 | | | | | | | | | | | |

| |
|---|
| **बैठकीची सूचना** |
| राज्य प्रशिक्षण धोरण |
| दिनांक ७.६.१३ दुपारी २.०० |

# महाराष्ट्र शासन

**क्रमांक : राप्रधो-२०१३/प्र.क्र. १८-२०१३/आस्था-२**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३१.५.२०१३

**प्रति,**

**आयुक्त / संचालक,**
(उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण व प्रशिक्षण / कला / ग्रंथालय)
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

विषय : महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणांतर्गत उच्च व तंत्रशिक्षण विभागासाठी सन २०१३-२०१४ चा प्रशिक्षण आराखडा...

**महोदय,**

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : टीआरएन ०९/प्र.क्र ३९-०९/ १२अ, दिनांक २३.९.२०११ अन्वये, राज्याचे प्रशिक्षण धोरण निश्चित करण्यात आले असून सन २०१३-२०१४ मध्ये उच्च व तंत्रशिक्षण विभागातील प्रशिक्षण धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता सहसचिव (आस्थापना), उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली, दिनांक ७.६.२०१३ रोजी समिती सभागृह, सार्वजनिक बांधकाम विभाग, दुसरा मजला, मंत्रालय, मुंबई येथे दुपारी २.०० वाजता बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीस सर्व संचालक तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सहसंचालकांनी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

सदर बैठकीमध्ये सन २०१३-२०१४ मध्ये राबवावयाच्या प्रशिक्षणाचे नियोजन व पूर्वतयारी याबाबत सविस्तर चर्चा होणार आहे. **आपणांस विनंती आहे की, सदर बैठकीकरिता खालील माहितीसह उपस्थित रहावे व तशा सूचना आपल्या अधिपत्याखालील सहसंचालकांनाही देण्यात याव्यात.**

१. आपल्या संचालनालयातील अधिकारी / कर्मचारी यांची गटवार (अ /ब /क /ड) संख्या,
२. अधिकारी / कर्मचारी यांचा शासन सेवेतील एकूण कालावधी,
३. सध्याच्या पदावर सरळसेवेने वा पदोन्नतीने कार्यरत असलेला सेवा कालावधी,
४. आपल्या संचालनालयाच्यादृष्टीने आणखी काही विशेष प्रशिक्षण आवश्यक वाटत असल्यास त्याबाबतची माहिती देणे, इत्यादी.

आपला,

(सं. श. चौबळ)
कक्ष अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव : सह संचालक, सर्व संचालनालये, उच्च व तंत्रशिक्षण विभाग

प्रत माहितीस्तव : डॉ. मिनल नरवणे, संचालक, मानव विकास केंद्र, यशदा, पुणे.